**जोडपत्र ९**

**महापरिपत्रक**

**कॅश रिझर्व रेशो (सीआरआर) व स्टॅअट्युटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर)**

**प्राथमिक सहकारी बँकांद्वारे ठेवल्या गेलेल्या कॅश रिझर्व व लिक्विड ॲसेट्सची दैनंदिन स्थिती दर्शविणा-या रजिस्टर मधील निरनिराळ्या शीर्षकांखाली आकडेवारी एकत्रित करण्यासाठी स्पष्टीकरणे**
**(परिच्छेद २.४ अन्वये)**

**(१) भारतामधील लायाबिलिटीज मध्ये पुढील बाबी समाविष्ट असणार नाहीत -**

(१) भरणा झालेले भांडवल किंवा राखीव निधी किंवा त्या सहकारी बँकेच्या नफा-तोटा लेखेमधील क्रेडिट बॅलन्स

(२) एखाद्या प्राथमिक सहकारी बँकेने, संबंधित राज्याच्या राज्य सहकारी बँकेकडून किंवा संबंधित जिल्ह्याच्या केंद्रीय सहकारी बँकेकडून घेतलेल्या कोणत्याही अग्रिम राशी

(३) एखादे राज्य सरकार, रिझर्व बँक, आयडीबीआय, एक्झिम बँक, नाबार्ड किंवा राष्ट्रीय सहकारी विकास निगम अधिनियम, १९६२ च्या कलम ३ खाली स्थापन झालेली राष्ट्रीय सहकारी विकास निगम ह्यांचेकडून घेतलेली कोणतीही अग्रिम राशी

(४) मंजुरीप्राप्त सिक्युरिटीजच्या विरुध्द एखाद्या सहकारी बँकेने घेतलेली अग्रिम राशी किंवा घेतलेली कर्ज व्यवस्था

(५) एखाद्या सहकारी बँकेने तिच्याकडे ठेवलेल्या शिल्लकेविरुध्द अग्रिम राशी दिली असल्यास, त्या अग्रिम राशीच्या आऊटस्टँडिंग रकमेपर्यंतची शिल्लक

(२) **बँकिंग सिस्टिम ह्या संज्ञेत पुढील बँका व वित्त संस्था येतात**

(१) भारतीय स्टेट बँक

(२) दुय्यम बँका

(३) संगत नव्या बँका

(४) प्रादेशिक ग्रामीण बँका

(५) बँकिंग कंपन्या

(६) बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम १८ च्या पोटकलम (१) च्या स्पष्टीकरणाच्या खंड (ड) खाली, ह्याबाबत, केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या इतर वित्त स्स्था

(३) टाईम लायाबिलिटीजमध्ये पुढील गोष्टी समाविष्ट आहेत  स्थिर ठेवी, रोख प्रमाणपत्रे, संचयित व आवर्ती ठेवी, बचत खात्याच्या ठेवींचा टाईम लायाबिलिटी भाग, कर्मचा-यांच्या सुरक्षा ठेवी, मागणी केल्यावर देय नसल्यास, पत-पत्रांविरुध्द ठेवलेले मार्जिन आणि वरील (५) बाबत अग्रिम राशींसाठी प्रतिभूती म्हणून ठेवलेल्या स्थिर ठेवी

(४) स्थिर ठेवींमध्ये पुढील बाबी समाविष्ट असतील  (१) कर्मचा-यांच्या भविष्यनिधीच्या ठेवी (२) कर्मचा-यांच्या सुरक्षा ठेवी (३) आवर्ती ठेवी (४) रोख प्रमाणपत्रे (५) १४ दिवसांपेक्षा अधिक नोटिस काल आवश्यक असलेल्या कॉल-ठेवी (६) भविष्यनिधी ठेवी (७) कंत्राटदारांच्या अर्नेस्ट मनी ठेवींसारख्या संकीर्ण ठेवी

(५) डिमांड लायाबिलिटीजमध्ये पुढील बाबी समाविष्ट आहेत  चालु ठेवी, बचत खाते ठेवींचा टाईम लायाबिलिटीज भाग, पतपत्रे/हमी ह्याविरुध्द ठेवलेली मार्जिन्स, मुदतबाह्य स्थिर ठेवींमधील शिल्लक, रोख प्रमाणपत्रे व संचयित/आवर्ती ठेवी, आऊटस्टॅंडिंग असलेली टेलिग्राफिक व मेल हस्तांतरणे, डिमांड ड्राफ्ट, हक्क न सांगितलेल्या ठेवी, कॅश क्रेडिट खात्यातील क्रेडिट बॅलन्सेस आणि मागणी केल्यावर देय असलेल्या अग्रिम राशींबाबत ठेवलेल्या ठेवी

(६) चालु ठेवींमध्ये पुढील बाबी असतील (१) १४ दिवस किंवा कमी कालावधी आवश्यक असलेली कॉल ठेव (२) कॅश क्रेडिट खात्यातील क्रेडिट बॅलन्स (३) परिपक्व झालेल्या पण काढून न घेतलेल्या स्थिर ठेवी

(७) चालु खात्यामधील निव्वळ शिल्लक ह्याचा, सहकारी बँकेच्या संदर्भातील अर्थ, त्या सहकारी बँकेने, भारतीय स्टेट बँक, एखादी संगत नवी बँक, ह्यामध्ये तिच्या चालु खात्यांमध्ये असलेल्या एकूण क्रेडिट बॅलन्सपेक्षा, अशा बँकांनी त्या सहकारी बँकेत ठेवलेल्या चालु खात्यांमधील एकूण क्रेडिट बॅलन्स जेवढ्याने अतिरिक्त/जास्त असेल (असल्यास) ती रक्कम

(८) जबाबदा-या (लायाबिलिटीज) काढण्यासाठी, एखाद्या सहकारी बँकेची, भारतीय स्टेट बँक, दुय्यम बँक, संगत नवी बँक, प्रादेशिक ग्रामीण बँक, एखादी बँकिंग कंपनी, किंवा केंद्र सरकारने ह्याबाबत अधिसूचित केलेली अन्य कोणतीही वित्तसंस्था ह्यांच्या बाबत असलेल्या एकूण जबाबदारीमधून, अशा बँका किंवा संस्थांची त्या सहकारी बँके बाबतची जबाबदारी वजा केली जाईल.

(९) इतर डिमांड व टाईम लायाबिलिटीजमध्ये, ठेवींवर उपार्जित झालेले व्याज, देय असलेली बिले, न दिलेले डिव्हिडंड, आणि जनतेला किंवा इतर बँकांना देय असलेल्या सस्पेन्स खात्यातील रकमांचा समावेश असेल.

(१०) बाहेरील बँकिंग सिस्टिम मधून (एलआयसी, युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया इत्यादि) मिळविलेला, मनी ॲट कॉल ॲंड शॉर्ट नोटिस, बाब क्र. २ मध्ये दाखविला जावा.

(११) एखादी बँक, इतर डिमांड लायाबिलिटीज व टाईम लायाबिलिटीज च्या बेरजेमधून बँकिंग सिस्टिम ला असलेल्या लायाबिलिटीज वेगळ्या करु शकत नसल्यास, संपूर्ण इतर डिमांड लायाबिलिटीज व टाईम लायाबिलिटीज त्या बाबीसमोर दाखवू शकतात.  उदा. - इतरांना असलेल्या भारतातील लायाबिलिटीज  -

(१) डिमांड लायाबिलिटीज आणि

(२) टाईम लायाबिलिटीज (जसे असेल त्याप्रमाणे)

(१२) बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम १८(१) च्या स्पष्टीकरणामधील खंड अ (२) व (३) खाली वगळण्यात आलेल्या सोडून, केवळ डिमांड व टाईम कर्जे (बॉरोइंग्ज) ह्या बाबीसमोर दाखविण्यात यावी

(१३) ‘इतर डिमांड लायाबिलिटीज’ व ‘टाईम लायाबिलिटीज’ (असेल त्याप्रमाणे) ह्यामध्ये पुढील बाबी समाविष्ट असतील दहा वर्षांपेक्षा अधिक काळ हक्क न सांगितल्या गेलेल्या ठेवी, बाहेरील लायाबिलिटीजच्या स्वरुपातील तरतुदी (म्हणजे, आयकर व इतर देय करांसाठी तरतुद, देय असलेले ऑडिटचे शुल्क, देय अस्लेला आस्थापना खर्च इत्यादि), देय व्याज, देय बोनस, देय देयके, देय डिव्हिडंड, शेअर सस्पेन्स, इतर सस्पेन्स व किरकोळ बाबी (बाह्य जबाबदा-या असलेल्या)

(१४) सहकारी बँकेने, संबंधित राज्याच्या राज्य सहकारी बँकेत किंवा संबंधित जिल्ह्याच्या केंद्रीय सहकारी बँकेत तिने ठेवलेल्या शिल्लकेवर अग्रिम राशी घेतली असल्यास, तिच्या विरुध्द काढलेल्या रकमेपर्यंतची शिल्लक ही भारतात ठेवलेली रक्कम समजली जाणार नाही

(१५) ह्या हेतुसाठी रक्कम काढताना पुढील बाबतीत ती रक्कम भारतात ठेवलेली रोकड समजली जाईल

(१) एखाद्या सहकारी बँकेने, स्वतःकडे, किंवा संबंधित राज्याच्या राज्य सहकारी बँकेमध्ये ठेवलेली रोकड किंवा शिल्लक किंवा रिझर्व बँकेत चालु खात्यात किंवा चालु खात्यांमधील निव्वळ शिल्लक, (आणि प्राथमिक सहकारी बँकेच्या बाबतीत) तसेच संबंधित जिल्ह्याच्या केंद्रीय सहकारी बँकेत ठेवलेल्या शिल्लका ह्या, कलम १८ खाली ठेवणे आवश्यक असलेली एकूण रोख रकमेपेक्षा जेवढ्याने जास्त असलेली रक्कम

(२) चालु खात्यातील निव्वळ शिल्लक.

**(१६) भारतातील बँकिंग सिस्टिम मधील ॲसेट्स पुढीलप्रमाणे**

(१) सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि (ब) इतर बँका व अधिसूचित संस्था ह्यामधील चालु खात्यांमध्ये, बँकिंग सिस्टिम मधील ॲसेट्स

(२) बँका व अधिसूचित वित्तीय संस्थांमधील इतर सर्व खात्यांमधील शिल्लका

(३) एक पंधरवडा किंवा त्यापेक्षा कमी काळाची शॉर्ट नोटिस किंवा कॉलवर परतफेड करण्याच्या ठेवी किंवा कर्जे ह्या स्वरुपात बँकिंग सिस्टिम ला उपलब्ध केलेले निधी.

(४) मनी ॲट कॉल व शॉर्ट नोटिस सोडून, बँकिंग सिस्टिम ला उपलब्ध करुन दिलेली कर्जे

(५) वरीलपैकी कोणत्याही बाबींखाली वर्गीकृत केल्या जाऊ शकत नाहीत अशा, बँकिंग सिस्टिम कडून येणे असलेल्या रकमा - उदा. सध्याच्या आंतर-बँक-प्रेषण सुविधा योजनेच्या बाबतीत, एखाद्या बँकेने इतर बँकांमध्ये ठेवलेली एकूण रक्कम (ट्रान्झिट किंवा इतर खात्यामध्ये) ही येथे दाखविली जाईल  कारण, अशा रकमा, शिल्लक किंवा कॉल मनी किंवा अग्रिम राशी म्हणून समजता येणार नाहीत.

(६) ह्या संदर्भात, येथे स्पष्ट करण्यात येते की, एखाद्या बँकेने कर्ज व्यवस्थेसाठी दुस-या बँकेत सिक्युरिटीज ठेवल्या असल्यास, अशा सिक्युरिटीज किंवा त्यांची भाररहित स्थिती/भाग हा, कर्ज घेणा-या बँकेने, बँकिंग सिस्टिम कडे असलेले ॲसेट्स म्हणून दाखवू नये.  त्याचप्रमाणे, ज्या बँकेला सिक्युरिटीज मिळाल्या आहेत तिने, त्या सिक्युरिटीज, बँकिंग सिस्टिम ला असलेल्या लायाबिलिटीज् म्हणून दाखवू नयेत.

(७) टिल मनी म्हणून ठेवलेले चलन व रुपयांच्या नोटा व नाणी ही भारतामधील रोकड (म्हणजे हातामधील रोकड) म्हणून दाखविण्यात यावी.  तथापि ह्यामध्ये, एखाद्या बँकेत ठेवलेल्या विदेशाच्या चलनांचा समावेश करु नये.

(१७) रोख रकमेमध्ये, इतर बँकांमधील शिल्लका किंवा बँक/चलनी नोटा, रुपयांची नाणी (एक रुपयाच्या नोटांसह) आणि रजिस्टरात नोंद केल्याच्या तारखेस वैध असलेली दुय्यम नाणी सोडून अन्य कोणत्याही बाबीचा समावेश केला जाऊ नये.

(१८) रिझर्व बँकेने ठरविलेल्या मूल्यांकन रीतीवर आधारित मूल्यांकन करावयाच्या भाररहित मंजुरीप्राप्त सिक्युरिटीज (सध्या हे मूल्यांकन सध्याच्या बाजार मूल्यापेक्षा अधिक नसलेल्या मूल्याने केले जाते)

(१९) एखाद्या सहकारी बँकेच्या भाररहित मंजुरीप्राप्त सिक्युरिटीज् मध्ये, तिने दुस-या संस्थेत, अग्रिम राशी किंवा कर्ज व्यवस्थेसाठी ठेवलेल्या तिच्या मंजुरीप्राप्त सिक्युरिटीजचा समावेश असेल. (ज्यांच्याविरुध्द कर्ज/अग्रिम राशी घेतलेली नाही त्या मूल्यापर्यंतच)

(२०) सोन्याचे मूल्यांकन सध्याच्या बाजारभावापेक्षा अधिक दराने केले जाऊ नये.